# <u>न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग कारंजा लाड यांचे न्यायालयात</u>

**संक्षिप्त फौजदारी केस क्रमांक  ११३८/२०२२**

CNR No. MHWSO7-002094-2022 **<u>गुन्हयाचा तपशिल</u>** नि. क्रमांक. ०३

| | | |
|---|---|---|
| १. | तक्रार दाखल दिनांक | २१-०९-२०२२ |
| २. | गुन्हा घडल्याचा दिनांक | २१-०९-२०२२ |
| ३. | तक्रार कर्ता | सरकार तर्फे, पोलीस स्टेशन, कारंजा शहर |
| ४. | आरोपीचे नाव | **सुभाष निळकंठ टेंभरे**<br>वय- ५५ वर्ष, व्यवसाय – मजुरी<br>रा. जयस्तंभ चौक, ता. कारंजा जि. वाशिम. |

५. **<u>गुन्हयाची हकीकत:-</u>**

दिनांक २१-०९-२०२२ रोजी १६.३० वाजताचे सुमारास जयस्तंभ चौक, कारंजा, येथे सार्वजनीक ठिकाणी तुम्ही पैश्याच्या हारजीतवर वरली मटक्याचा जुगार खेळतांना मिळुन आले. तसेच तुमच्याकडून वरली मटका साहित्य व नगदी ५४०/-मिळुन आले व त्यायोगे तुम्ही महाराष्ट्र जुगार कायदा कलम १२(अ) अन्वये गुन्हा केला आहे.

६. **<u>आरोपीची जबाणी:-</u>**

प्रश्न १: तुम्हास केसेसच्या नकला मिळाल्यात काय ?

उत्तर : होय.

प्रश्न २: तुम्हास उपरोक्त गुन्हयाचा तपशिल वाचुन दाखविण्यात आला व तुम्हाला समजला काय?

उत्तर : होय

प्रश्न ३: तुम्हास गुन्हा कबुल आहे काय ?

उत्तर : होय

आरोपीची सही

......................

स्वा/-

( म. त्रि. ठवरे )

न्यायदंडाधिकरी प्र.वर्ग, न्यायालय कारंजा.

सरकारी अभियोक्ता यांनी असा युक्तीवाद केला की, आरोपीने गंभीर स्वरुपाचा गुन्हा केला असून त्यांना जास्तीत जास्त दंड करण्यात यावा. आरोपींनी नि. क्र. ०२ अर्ज दाखल करुन गुन्हा कबुल केला. तसेच त्याने त्याची आर्थिक परिस्थिती दुर्बल असुन त्याचा रोजमजुरीचा व्यवसाय आहे व तोच त्याचे कुटूंबातील एकमेव कर्ता व जवाबदार व्यक्ती आहे. त्यामुळे त्याला दया करुन कमीत कमी दंड आकारण्यात यावा अशी विनंती केल्यामुळे खालीलप्रमाणे शिक्षा/दंड ठोठाविण्यात येत आहे.

## आदेश

१. आरोपी सुभाष निळकंठ टेंभरे यांस फौ.प्र.सं. चे कलम २५२ प्रमाणे म.जु.का. कलम १२(अ) अन्वये होणा–या गुन्हयासाठी दोषी धरण्यात आले असून त्यास सदर गुन्हयासाठी कोर्ट उठेपर्यंत कैदेची शिक्षा व रुपये ३००/–(रुपये तीनशे फक्त ) दंड करण्यात येतो. दंड न भरल्यास आरोपीने ५ दिवसाची साध्या कारावासाची शिक्षा भोगावी.

२. याप्रकरणात जप्त केलेला मुद्देमाल वरली मटका साहित्य हे मुल्यहीन असल्यामुळे ते नियमाप्रमाणे अपील कालावधी संपल्यानंतर नष्ट करावे.

३. त्याचप्रमाणे जप्त करण्यात आलेले नगदी ५४०/– रुपये अपील कालावधी संपल्यानंतर सरकार जमा करण्यात यावे.

४. आरोपीने गुन्हा मान्य केल्यामुळे प्रकरण बंद करण्यात येते.

स्वा/–

दिनांक १२/११/२०२२

( म. त्रि. ठवरे )

न्यायदंडाधिकरी प्र.वर्ग, न्यायालय कारंजा.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/ Order are same word to word as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Steno. | :- | K.A. Paraswai (Steno. Gr- III) |
| Court Name | :- | Civil Judge (Jr.Dn.) and J.M.F.C., Karanja. Dist. Washim. |
| Date | :- | 12/11/2022 |
| Order signed by the presiding officer on | :- | 12/11/2022 |
| Order uploaded on | :- | 16/11/2022 |